(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# स्वतंत्र विदर्भ चळवळ

**डॉ. प्रा. सौ. मेघा संजय पाटील**

मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली

.......................................................................................

**प्रस्तावना :—**

विदर्भ या मराठी भाषिक मुलूकाची स्वतंत्र ओळख त्या प्रदेशाच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक जडणघडणीत निर्माण झालेली असून विदर्भाला 'वऱ्हाड' म्हणूनही ओळखले जाते .विदर्भ हा महाराष्ट्र राज्याच्या ईशान्य दिशेला असणारा प्रदेश आहे. विदर्भाचे दोन उपविभाग आहेत .(नागपूर आणि अमरावती) विदर्भात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, वाशिम आणि गडचिरोली हे जिल्हे आहेत विदर्भाचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३१.६ टक्के आहे. तर लोकसंख्या २१.३ टक्के आहे .उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भाची आर्थिक उन्नती कमी झालेली आहे. विदर्भाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषिप्रधान आहे. या प्रदेशात कापूस, संत्रे आणि सोयाबीन ही उत्पन्न देणारी मुख्य पिके आहेत तसेच या प्रदेशात ज्वारी बाजरी आणि तांदळाची लागवड होते .विदर्भ म्हणजे वीर + तर्फ म्हणजेच वीर आणि त्यांचा प्रदेश होय. विदर्भ ही मराठी सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, यादव, राजवटीतील वीर पुत्रांची भूमी आहे. विदर्भ शब्दाचा अर्थ वीर आणि तर्फचा अपभ्रंश होवून विदर्भ झाले तर्फ म्हणजे प्रदेश या तरफचा दर्भ झाला आणि वीर मधला र गायब झाला आणि बनला वीरांचा प्रदेश विदर्भ विदर्भाची भाषा मराठी असून तिची ढब वेगळी असल्यामुळे तिला वऱ्हाडी म्हणून ओळखले जाते. त्या भाषेवर हिंदीचा प्रभाव अधिक जाणवतो त्यामुळे हा प्रदेश महाराष्ट्रातील इतर प्रदेशापेक्षा सांस्कृतिकदृष्ट्या देखील वेगळा आहे. या प्रदेशावर नागवंश महानुभाव गोंड आणि भोसले यांचा प्रभाव आणि वर्चस्व राहिले आहे. महात्मा गांधीचा वर्ध्याजवळील सेवाग्राम आश्रम आणि विनोबा भावे यांचा पवनार आश्रम यामुळे ही भूमी स्वातंत्र्य आंदोलणाची कर्मभूमी ठरली.

भारतीय राजकीय व्यवस्थेत राज्यपुर्नरचनेच्या वेळी मोठी राज्ये करण्यावर भर होता .आज त्यामध्ये बदल झालेला असून लहान लहान राज्यांना अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. एकभाषा हा राज्य निर्मितीचा मुख्य आधार होता. या आधारावर निर्माण झालेल्या राज्यातील सर्व भागांचा विकास सारख्या प्रमाणात होवू शकला नाही. सर्वच मोठया राज्यामध्ये काही भाग दुर्लक्षित व मागास राहिले. आणि ते स्वतंत्र राज्याची मागणी करू लागले महाराष्ट्रातील स्वतंत्र विदर्भाची मागणी ही या प्रकारातील असून अलिकडे ती गतिमान झाल्याचे दिसून येत आहे. तेलंगणा हे स्वतंत्र राज्य झाल्यानंतर स्वतंत्र विदर्भाच्या मागणीने जोर धरला त्याच बरोबर महाराष्ट्राचे महाधिवक्ता म्हणून कार्यरत असलेले श्रीहरी अणे यांनी स्वतंत्र विदर्भाच्या बाजूने स्पष्ट भूमिका घेतली व आपल्या पदाचा राजीनामा दिला त्यांनी 'स्वतंत्र विदर्भ राज्य' आघाडीची स्थापना करून स्वतंत्र विदर्भाची चळवळ गतिमान केली. स्वतंत्र विदर्भ चळवळ सुरू करण्यात श्री हरी अणे यांचे आजोबा लोकनायक अणे यांचा सिंहाचा वाटा होता

**नैसर्गिक साधनसंपत्ती**

१९६० साली भाषिक आधारावर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यावर विदर्भाचे महाराष्ट्रात विलीनीकरण झाले. प्रशासकीय दृष्टिकोनातून विदर्भाची विभागणी नागपूर आणि अमरावती अशा दोन महसूल विभागात झाली. नागपूर पूर्व विदर्भ तर अमरावती पश्चिम विदर्भ म्हणून ओळखला जातो. विदर्भातील एकून क्षेत्रापैकी २८ टक्के क्षेत्रात जंगल आहे. एकूण क्षेत्रफळाच्या ५७ टक्के भाग पिकाखालील क्षेत्र आहे. उर्वरित १८ टक्के जमीन ही कुरण व इतर उपयोगासाठी वापरली जाते. विदर्भातील जंगल क्षेत्राचे प्रमाण महाराष्ट्राच्या ५८ टक्के आहे. महाराष्ट्रात जेवढे खनिज उत्पादन होते. त्यापैकी ६० टक्के उत्पादन विदर्भात होते विदर्भातील लोहसाठयाचे प्रमाण महाराष्ट्राच्या ८० टक्के आहे. कोळसा साठयाचे प्रमाण १०० टक्के आहे. महाराष्ट्रात जेवढी वीजनिर्मिती केली जाते. त्याच्या ७० टक्के वीजनिर्मिती विदर्भात केली जाते

.त्यातील ३० टक्के वीज विदर्भासाठी वापरली जाते.बाकीची वीज उर्वरित महाराष्ट्रात वापरली जाते.विदर्भातील कापूस उत्पादनाचे प्रमाण महाराष्ट्राशी असलेल्या प्रमाणाच्या ७५ टक्के इतके आहे.विदर्भातील बुटीबोरी येथील औद्योगिक क्षेत्र हे भारतातील नव्हे तर आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचे औद्योगिक क्षेत्र आहे.चंद्रपूर जिल्हयातील बदलापूर येथील कागद कारखाना हा भारतातील कागद निर्यात करणारा सर्वात मोठा कारखाना आहे.विदर्भाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीशी निगडीत आहे.विदर्भात कापूस, संत्रा, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, तांदूळ ही पिके घेतली जातात.अमरावती जिल्हा संत्रा उत्पादनामधील सर्वात मोठा जिल्हा आहे.गोंदिया जिल्हयात तांदूळ उत्पादन मोठया प्रमाणात होते.तर यवतमाळ जिल्हयात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात होते.

**विदर्भाचा इतिहास —**

१८१७ पर्यंत विदर्भावर भोसल्यांचे राज्य होते १८५३ मध्ये ब्रिटीशांनी भोसल्यांचे राज्य खालसा केले निजामाने तैनाती फौजांच्या खर्चासाठी हा महसूल प्रदेश म्हणून ब्रिटीशांना दिला ब्रिटिशांनी १९०५ मध्ये हा प्रदेश छत्तीसगडचे जिल्हे यांचे मिळून मध्यप्रांत वऱ्हाड राज्य निर्माण केले.हा निर्णय विदर्भीय जनतेला मान्य नव्हता.हा प्रदेश मराठी भाषिक मुंबई प्रांतास जोडावा यासाठी दादासाहेब खापर्डे यांनी आंदोलन उभारले लोकनायक बापूजी अणे यांच्या नेतृत्वाखाली वऱ्हाड सर्वपक्षीय समिती स्थापन करून गोलमेज परिषदेत कैफियत मांडली.१९३६ च्या प्रतिक निवडणूकी नंतर हिंदी भाषिक प्रांतात मराठी भाषिकांची गळचेपी होईल म्हणून १९३८ ला वऱ्हाड मधील विधानसभेत बॅ.रामराव देशमुखांनी वेगळया विदर्भाचा ठराव मांडला आणि बापूजी अणे यांनी महाविदर्भ स्वतंत्र अहवाल दिला.व १९४०ला महाविदर्भ सभा स्थापन झाली.याच सुमारास भाषावर प्रांत रचनेची मागणी जोर धरत होती.१९३८ ला मुंबई साहित्य संमेलनात मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य व्हावे यासाठी प्रथम ठराव मांडला गेला त्या नंतर १९४६ ला बेळगाव साहित्य संमेलनात ग.त्र्य.मांडखोलकरांनी संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला व संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली विदर्भासह संयुक्त महाराष्ट्रासाठी प्रचंड जन — आंदोलन करण्यात आले.१९४७ च्या अकोला करारानुसार महाविदर्भ व पश्चिम या दोन उपप्रांतांची दोन वेगळी मंत्रीमंडळे व कायदे मंडळे असावीत, सर्व प्रांताकरता एक गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर असावा, उपप्रांतीय कायदेमंडळाच्या वेगवेगळया निवडणूका घेण्यात याव्यात, दोन हायकोर्ट असावीत, संयुक्त महाराष्ट्र नाही झाला तर पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी वेगळया विदर्भाला पाठिंबा द्यावा असे ठरले या अकोला करारावर बापूजी अणे यांची सही होती.परंतू पुढे फाजल अली समितीची नेमणूक करून एका भाषिकांचे एकच राज्य होईल दोन राज्ये होणार नाहीत.असा आदेश केंद्र सरकारने दिला.तेव्हा अकोला करार निष्फळ ठरला.म्हणून महाविदर्भ नेत्यांनी आणि महाराष्ट्रातील नेत्यांनी एकत्र येवून नागपूर करार केला.

**नागपूर करार —**

२८ सप्टेंबर १९५३ रोजी महाराष्ट्रीय आणि विदर्भातील नेत्यांनी नागपूर करार केला. बॅ.रामराम देशमुख, शेषराव वानखेडे, रा.कृ.पाटील गोपाळराव खेडकर पी.के.देशमुख, भाऊसाहेब हिरे, नानासाहेब कुंटे, देवकीनंदन आणि यशवंतराव चव्हाण इत्यादी नेत्यांच्या सहया नागपूर करारावर होत्या.संयुक्त महाराष्ट्रात सामील झाल्यास विदर्भाला दुय्यम वागणूक मिळेल व नागपूरचा राजधानीचा दर्जा जाईल.आणि विकासात अडथळे येतील अशी भिती विदर्भवाद्यांना वाटत होती.म्हणून यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र परिषद आणि विदर्भातील नेत्यांमध्ये विचार विनिमय होवून नागपूर करार करण्यात आला होता या करारानुसार सर्व मराठी भाषिकांचे एक राज्य व्हावे, त्याची राजधानी मुंबई असावी विकास योजनांसाठी महाविदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र असे तीन विभाग करावेत, राज्याच्या महसुलाची व खर्चाची विभागणी लोकसंख्येच्या प्रमाणात विभागवार करावी, मराठवाडयाचे मागासलेपण घालविण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत.राज्य मंत्रीमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात त्या—त्या विभागाला प्रतिनिधित्व मिळावे, व्यावसायिक व शास्त्रीय शिक्षण संस्थांत प्रत्येक

घटकाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रवेश मिळावा . उच्च न्यायालयाचे मुख्य पीठ मुंबईला व खंडपीठ नागपूरला असावे त्यात विदर्भातील प्रतिनिधींना पुरेसा न्याय द्यावा, सरकारी नोकरीत विभागवर लोकसंख्येच्या प्रमाणात संधी मिळावी, दरवर्षी विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपूरला व्हावे आणि खेडे घटक आधारभूत मानून तेथील लोकसंख्येच्या प्रमाणात मराठी भाषिक क्षेत्र निश्चित करावे इत्यादी तरतूदी नागपूर करारात होत्या . त्याला कायदेशीर अधिष्ठान मिळावे म्हणून १९५३ मध्ये भारतीय संविधानातील कलम ३७१ (२) अन्वये दुरूस्ती करून प्रादेशिक वैधानिक मंडळ स्थापन करण्याचे अधिकार राज्यपालांना देण्यात आले . १९५९ च्या पोटनिवडणूकीत (नागपूर — उमरेड) मतदार संघातून अणे यांनी कॉग्रेसकडून उमेदवारी अर्ज भरला . नंतर बापूजी अणे संयुक्त महाराष्ट्राचे कट्टर विरोधक आणि स्वतंत्र नागविदर्भ च्या स्वतंत्र राज्यांचे पुरस्कर्ते बनले . १९५९ सालीच श्री . ब्रिजलाल बियाणी यांनी नागपूर राजभवनाच्या मागे विदर्भवादी लोकांचा सत्याग्रह घडवून आणला त्यावर्षी संपूर्ण विदर्भभर आंदोलने चालू होती . संयुक्त महाराष्ट्र समितीला विरोध करून स्वतंत्र — नाग विदर्भ राज्याची मागणी पुढे आली . मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भवादी लोकांना शांत करण्याचा प्रयत्न केला .१९६० साली विशाल व्दिभाषिक मुंबई राज्याचे विभाजन करण्याचे ठरले . महाराष्ट्र व गुजरात ही दोन वेगळी राज्ये निर्माण होत असतानाच विदर्भ आंदोलनाला जोर चढला पोलीसांच्या हस्तक्षेपामुळे विदर्भ आंदोलन शांत झाले . काहीशा नाराजीने विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला .

**प्रादेशिक असमतोल :—** विदर्भ मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र यांच्यात विकास प्रक्रिया सारख्या प्रमाणात राबविली जाईल अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात मात्र पश्चिम महाराष्ट्र सर्व बाबतीत आघाडीवर राहून मराठवाडा खानदेश विदर्भात मोठया प्रमाणात विकासाचा असमतोल निर्माण झाला भौगोलिक परिस्थिती, पश्चिम घाटाची नैसर्गिक समृध्दी पाण्याची बारमाही उपलब्धता यामुळे कायमच सधन राहिलेला हा प्रदेश सर्वांगाने समृध्द बनला बरीच दशके मराठवाडा निजामाच्या राजवटीत असल्यामुळे तेथील मराठी पण कमकुवत झाले होते . विदर्भ कायमच एका राजवटीतून दुसऱ्या राजवटीत प्रवास करत होता पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कमी समृध्द असे हे दोन मोठे भौगोलिक आणि सांस्कृतिक प्रदेश महाराष्ट्रात आले राज्यातला असमतोल अभ्यासण्याठी महाराष्ट्र सरकारने १९८३ साली अर्थतज्ञ व्ही, एम दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती गठीत केली . राज्याच्या संतुलित विकासासाठी विविध विभागांना साधनसंपत्तीची गरज ३१८७ कोटी रूपये असल्याचे दांडेकर समितीच्या अहवालात दिसून आले त्यात विदर्भाचा वाटा ३९% उर्वरीत महाराष्ट्राचा ३७% मराठवाडयाचा २४% इतका होता .१९९५ साली राज्यपालांनी Indicators and Backlog Committee गठीत केली . जुलै १९९७ मध्ये या समितीच्या अहवालात असे सांगण्यात आले की प्रादेशिक असमतोल भरून काढण्यासाठी रू . १५.३५५ कोटीची गरज आहे . त्यात विदर्भाचा वाटा ४७% मराठवाडयाचा २८% तर उर्वरित महाराष्ट्राचा २३% इतका आहे . अनुशेष आणि विकास खर्चाचे समान वाटपाचा नव्याने विचार करून साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप करण्यासाठी व तशी तत्वे सुचित करण्यासाठी ज्येष्ठ अर्थतज्ञ विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली ३१ में २०११ रोजी उच्चस्तरीय समिती स्थापना करण्यात आली . २० जुलै २०१२ च्या G.R ने महाराष्ट्र सरकारने मार्च २०१३ पर्यंत समितीला मुदतवाढ दिली . माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २० जून २०१९ रोजी विधानपरिषदेत स्पष्ट केले की विदर्भ आणि मराठवाडयातील अनुशेष भरून काढण्यासाठी नेमण्यात आलेल्या केळकर समितीच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या नाहीत .कारण या शिफारशी स्वीकारल्यास मराठवाडा व विदर्भावर अन्याय होईल . केळकर समितीने विकासासाठी जिल्हयाऐवजी तालुका घटक मान्य केल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांना अधिक निधी मिळेल केळकर समितीच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती . आत्तापर्यंतच्या विविध समित्यांनी प्रादेशिक अनुशेषावर लक्ष केंद्रित कले होते परंतू केळकर समितीने वेगळी भूमिका घेत प्रादेशिक अनुशेषापेक्षा प्रादेशिक विकासावर भर दिला ही बाब विदर्भवाद्यांना मान्य नव्हती

त्यामुळे इतक्या समित्या त्यांचे अहवाल वारंवार हजारो कोटींच्या निधीची तरतूद करूनही असमतोल कमी झालेला दिसत नाही स्वतंत्र राज्याच्या समतोल विकासाबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर समितीच्या शिफारशीवर सरकारने काही कारवाई केलेली नाही. त्यामुळे राज्याच्या विकासाबाबतच्या प्रादेशिक असमतोलाचा शोध घेवून उपाययोजना सुचविण्यासाठी पुन्हा तज्ञांची समिती नेमण्याचे आदेश राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी सरकारला दि. ७ मार्च २०२० रोजी दिले. व विशेष अनुशेष समितीने १९९४ मध्ये निर्धारित केलेला वित्तीय अनुशेष दूर झाला आहे. मात्र याला आता २५ वर्षाहून अधिक काळ लोटला असून १९९४ नंतर निर्माण झालेल्या प्रादेशिक विकासातील असमतोलांचे मूल्यांकन करण्याची गरज आहे. अनुशेषाचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या केळकर समितीच्या शिफारशीचे काहीही झाले नाही. त्यामुळे पुन्हा समिती गठीत करावी असे राज्यपालानी आपल्या आदेशात म्हटले आहे. त्याच बरोबर राज्याच्या मागास भागातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी जलसंपदा विभागाने योजना तयार कराव्यात असे आदेश राज्यपालांनी दिले आहेत.

**विदर्भ चळवळ पक्षीय संदर्भ :—**

कॉंग्रेसपक्षीय नेतृत्वाने वेगळया विदर्भाच्या चळवळीला क्षीण करण्यासाठी वेळोवेळी डावपेचाचे राजकारण केले. श्रीमती इंदिरा गांधीच्या काळात जांबुवंत धोटयांच्या फॉरवर्ड ब्लॉकला कॉंग्रेस मध्ये समाविष्ठ करून घेतले व त्यांच्या आंदोलनाचा जोर कमी केला बनवारीलाल पुरोहितांनी राममंदिर प्रश्न पुढे करून कॉंग्रेसची साथ सोडली व भाजपमध्ये प्रवेश केला. मात्र त्यांनी भाजपच्या व्यासपीठावर तिरपुडे यांच्या विदर्भ विकास महासभेव्दारे विदर्भाचा मुद्दावेतन ठेवला. परंतू जवाहरलाल दर्डासह अन्य कॉंग्रेस नेत्यांनी विदर्भ विकास समितीला पाठिंबा देवून वेगळया विदर्भाची चळवळ क्षीण करण्यास अप्रत्यक्षपणे मदतच केली. मात्र १९९५ च्या निवडणूकीत कॉंग्रेसचा पराभव झाला तेव्हा कॉंग्रेस नेतृत्वाने विदर्भ राज्य मागणीला पुन्हा पाठबळ देण्याचा प्रयत्न केला आणि विदर्भसेना स्थापना करून चळवळीत प्राण आणण्याचा प्रयत्न केला परंतू आपआपसातील राजकारणामुळे त्यांच्यात फुट पडली. व ही चळवळ पुन्हा फुटीमुळे अडचणीत आली. भाजपाने छोटया छोटया राज्यांच्या स्थापनेस मान्यता देवून १९९९ च्या लोकसभा निवडणूकीत विदर्भाच्या मागणीला पाठिंबा दिला होता. विदर्भातील आमदारांनी विदर्भ राज्य संघर्ष समिती विदर्भ राज्य गण परिषद विदर्भ मुक्ती मोर्चा इत्यादी समित्याव्दारे विदर्भ राज्य निर्धार यात्रा काढण्यात आली त्याला शिवसेना व डावेपक्ष अपवाद होता व कॉंग्रेस यासाठी अनुकूल नव्हती तरी देखील या यात्रेने जनजागृती केली यात्रेव्दारे रास्ता रोको ही झाला. त्याला हिंसक वळण लागले. विदर्भाच्या राजकारणात ब्रिजलाल बियाणी व बापूजी अणे यांची भूमिका महत्वपूर्ण मानली जाते. त्यांनी स्वतंत्र विदर्भाचा ध्यास घेवून त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली विदर्भातील गोपाळराव खेडकर पी. के. देशमुख कन्नमवार व त्याच्या सारख्या इतर कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी ब्रिजलाल बियाणी व बापूजी अणे यांची साथ सोडली नसती तर स्वतंत्र विदर्भ राज्याची स्थापना यापूर्वीच झाली असती परंतु दुदैवाने तसे होवू शकले नाही. केंद्रात भाजप सरकार आहे. मागच्या पाच वर्षात महाराष्ट्रातही भाजपा शिवसेना आघाडी सरकार होते महाराष्टाचा मुख्यमंत्रीच विदर्भाचा होता ॲड. श्रीहरी अणे यांनी महाधिवक्ता पदाचा राजीनामा देवून स्वतंत्र विदर्भासाठी आंदोलन छेडले आहे. दिल्ली दरबारी वजनदार मंत्री नितीन गडकरींचा प्रभाव आहे. राजकीय नेतृत्व बदलले की विकासाला गती येते असा एक समज आहे परंतू मराठावाडा विदर्भ या विभागांना राज्य नेतृत्वाची संधी अनेकवेळा मिळाली होती. मारोतराव कन्नमवार व वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक, शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, इत्यादी मुख्यमंत्री होते. परंतू त्यांना विदर्भ मराठवाडयाला न्याय देता आला नाही. त्यांना विदर्भ मराठवाडयातील अनुशेष भरून काढता आला नाही. देवेंद्र फडणवीसही विदर्भातीलच नेते आहेत. त्यांनीही केळकर समितीच्या शिफारशी स्वीकारून विदर्भ व मराठवाडयावरील अन्याय दूर करणे गरजेचे होते. स्वतंत्र वेगळे विदर्भ राज्य योग्य वेळी

निर्माण होईल ही देवेंद्र फडणवीस यांची भूमिका विदर्भाच्या हिताची आहे. परंतू शिवसेनेचा स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीस विरोध आहे. केंद्र व राज्यात भाजपची सत्ता होती देशात उत्तराखंड, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण अशी लहान लहान राज्ये निर्माण झाली आहेत. स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी अव्यहार्य नाही. कारण स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीमुळे उर्वरित महाराष्ट्राचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण झाल्यास ते आपला सर्वांगीण विकास अधिक जोमाने करू शकेल. विदर्भातील नेतृत्वाला विदर्भाच्या प्रश्नावर आत्ता पर्यंत जी दुटप्पी भूमिका घ्यावी लागली त्यामुळे तेलंगण स्वतंत्र राज्य निर्माण होवू शकले मात्र विदर्भ होवू शकले नाही. अनेक नेते अनेक समित्या झाल्या मात्र आंदोलनाचे रूपांतर जनआंदोलनात झाले नाही. विदर्भातील नेत्यांची धरसोड भूमिका स्वार्थी राजकारण, राजकीय पक्षांची मुंबईतील वेगळी भूमिका आणि नागपूरातील वेगळी भूमिका अशा दुटप्पी अवस्था. स्वतंत्र विदर्भाचे समर्थन करणाऱ्या स्थानिक राजकीय पक्षांचा अभाव यामुळे विदर्भ चळवळ क्षीण झाली. विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात राहणे कसे फायद्याचे आहे अशी मांडणी पश्चिम महाराष्ट्रातील नेते वारंवार करत आहेत. काही मोजके लोकच विदर्भाचा मुद्दा पुढे करतात. त्याला जनमान्यता नाही. त्यामुळे विदर्भाची मागणी लोकमागणी ठरू शकली नाही. आर्थिकदृष्टया वेगळा विदर्भ व्यवहार्य ठरणार नाही. विदर्भाच्या प्रश्नावर राजकीय पक्षांनी आपल्या भूमिका व धोरणे निश्चित करण्याची आवश्यक्ता आहे. धर—सोडीच्या राजकारणामूळे कॉग्रेस पक्षाचा विदर्भातील जनाधार कमी होताना दिसत आहे. विदर्भ राज्य आंदोलन समिती, विदर्भ राज्य आघाडी, विदर्भ माझा, आमआदमी पार्टी, बहूजन रिपब्लिक सोसीयालिस्ट पार्टी, शेतकरी संघटना, प्रहार जनशक्ती पक्ष, नागविदर्भ आंदोलन समिती, आर. पी. आय. जाम्बुवंतराव धोटे विचार मंच आदी विदर्भातील सर्व विदर्भवादी पक्ष संघटना यांचे नेते व प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक दि. २७ नोव्हेंबर २०१८ ला नागपूर येथे पार पडली. २०१४ च्या निवडणूकीत भाजपने विदर्भातील जनतेला स्पष्ट आश्वासन दिले होते. केंद्रात भाजपची सत्ता आली तर स्वतंत्र विदर्भ देवू विदर्भाच्या नावाने भाजपाचे ४४ आमदार निवडून आले परंतू २०१९ च्या निवडणूका झाल्या केंद्रात भाजपची सत्ता आली तरीही भाजपाने विदर्भ राज्याची निर्मिती केली नाही. उलट अमित शहा म्हणाले विदर्भ आमच्या अजेंडयावर नाही विदर्भातील नेत्यांनी 'विदर्भ निर्माण महासंघ' निर्माण करून 'संकल्प विदर्भ निर्मितीचा' हे घोषवाक्य ठरविण्यात आले आहे. विदर्भ निर्माण महासंघाला संघटनेची तात्विक चौकट व विदर्भाच्या विकास प्रारूपाला अनुसरून तयार केलेल्या कार्यक्रमाची माहिती जनतेपर्यंत पोहचवून त्यासंबंधीची जाणीव जागृती करावी लागेल त्यासाठी मोठया प्रमाणात शिस्तबध्द संघटन व मानवधन तयार करण्याची प्रक्रिया गतिमान करावी लागेल. असे झाले तरच अणे यांच्या पुढाकाराने निर्माण झालेल्या स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीला बळ मिळेल अन्यथा विदर्भवादी संघटनेत आणखी एकाची भर पडेल इतकेच स्वतंत्र विदर्भ मागणी जोपर्यंत जनतेची मागणी होत नाही. तिचे लोकचळवळीत रूपांतर होत नाही. तोपर्यंत स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीची प्रक्रिया फलद्रुप होणार नाही आजचे विदर्भवादी आंदोलन हे केवळ काही महत्वकांक्षी राजकीय नेतृत्वाने काही राजकीय स्वार्थाने प्रेरित होवून उभे केलेले आंदोलन आहे की, हा मागास भागातील लोकांच्या विकासाविषयक आकांक्षा व तक्रारींचा अविष्कार आहे यांची नीटपणे तपासणी होणे गरजेचे आहे. या प्रश्नाकडे नकारात्मक भावनेतून न पाहता शाश्वत व समन्वय विकासाचा आराखडा तयार करून त्यास गती देण्याचा प्रयत्न व्हावा विदर्भाची चळवळ मजबूत करायची असेल तर पश्चिम विदर्भातील लोकांना सोबत घेण्याची गरज आहे. एखाद्या चळवळीचे राजकीयकरण झाले तर ती चळवळ संपते. स्वतंत्र विदर्भ हवा असेल तर रणनीती बदला असे आवाहन जनमंचचे अध्यक्ष प्रा. शरद पाटील यांनी विदर्भवादी संघटनांना केले आहे.

**निष्कर्ष :—**

विदर्भाच्या भौगोलिक परिस्थितीचा परिणाम विदर्भातील लोकांच्या विचार करण्याच्या पध्दतीवर झालेला आहे. जेमतेम पर्जन्यमान परिणामत: मोठया प्रमाणात कापूस या नगदी

पिकास महत्व काही भागात खाणी त्याचा परिणाम व्यापारात रूची राजकारणाच्या प्रक्रियेकडे लोकांचे सततचे लक्ष विदर्भातील नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्रात सामील होताना भावनेपेक्षा विदर्भाच्या भौतिक विकासास प्राधान्य दिले नागपूर करार करून ते सामील झाले. स्वतंत्र विदर्भाची चळवळ स्वातंत्र्योत्तर काळात काही जिल्हयापुरती मर्यादित होती विदर्भाचा विचार करता ही चळवळ क्षीण होती. शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणावर झालेल्या आत्महत्या हा आता विदर्भाच्या राजकीय विचाराचा केंद्रबिंदू शहरी आणि ग्रामीण भागात आहे. शेतीसाठी आवश्यकत्या गोष्टी झाल्या नाहीत यावर उपाय म्हणजे स्वतंत्र विदर्भराज्य या निष्कर्षापर्यंत विदर्भीय नेते आणि जनता पोहोचली आहे. स्वतंत्र विदर्भ हाच त्यांच्या राजकीय विचाराचा केंद्रबिंदू बनला आहे.

संदर्भ :—

१) लोकमत २९ नोंव्हेंबर २०१८
२) लोकसत्ता ७ मार्च २०२०
३) जोशी श्रीपाद 'वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र' एका वादाची सद्यस्थिती — ग्रंथाली प्रकाशन मुंबई २००३.
४) वासनिक अनिल 'विदर्भ राज्य — वास्तव आणि विषर्यास' २०१०.
५) shodhganga inflibnet.ac.in
६) https://mr.m.wiki.pedia.org.wiki
७) विचारमंथन : 'भारतातील छोटया घटकराज्यांचा प्रश्न' जाने — एप्रिल २०१७
८) पाटील बी.बी.डॉ.चव्हाण उर्मिला 'महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि चळवळी' फडके प्रकाशन कोल्हापूर २०१५.